ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना कर वसुलीच्या प्रमाणात किमान वेतन अदा करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

### शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम-२०२०/प्र.क्र.१४० /पं.रा-३

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
तारीख: - २८ एप्रिल,२०२०

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम २६९९/प्र.क्र.२०६(१)/२१, दि. २१ जानेवारी, २०००.

२) शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम२०१२/प्र.क्र.२३५/पंरा-३, दिनांक ४ मार्च, २०१४.

३) शासन निर्णय क्रमांक :- व्हीपीएम २०१८/ प्र.क्र.३९७/ पंरा-३,दि.१७ सप्टेंबर,२०१८

प्रस्तावना :-

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ६१ प्रमाणे ग्रामपंचायतीला त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे कर्मचारी नेमण्याचे व त्यांचे वेतन ठरविण्याचे अधिकार आहेत. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ३ जुले, १९९० च्या अधिसूचनेनुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू करण्यात आले आहे. त्यामुळे संदर्भाधीन क्र.१ येथील दिनांक २१ जानेवारी, २००० च्या शासन निर्णयान्वये लोकसंख्यानिहाय ग्रामपंचायतीचा आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे. सदर आकृतीबंधानुसार नेमलेल्या कर्मचा-यांना संदर्भाधीन क्र.२ येथील दिनांक ४ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयान्वये ग्रामपंचायतीचे उत्पन्न व लोकसंख्येचा विचार करुन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनासाठी लोकसंख्या व उत्पन्नानुसार किमान वेतनासाठी शासनाकडून अनुज्ञेय हिस्साची टक्केवारी ठरविण्यात आली होती. तथापि, १०० % व ७५% प्रमाणे वाढीव हिस्यांस पात्र होण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतीनी नियमाप्रमाणे दर चार वर्षानी नियमितपणे फेरआकारणी करणे व गत वर्षात सर्व करांच्या एकूण मागणीची ९०% वसूली करणे बंधनकारक राहील अशी अट संदर्भ क्र.२ येथील दिनांक ०४ मार्च, २०१४ रोजीच्या शासन निर्णयात नमूद करण्यात आली होती. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनासाठी लोकसंख्या व उत्पन्नानुसार किमान वेतनासाठी शासनाकडून अनुज्ञेय हिस्साची टक्केवारी दिनांक ०४ मार्च, २०१४ निश्चित करण्यात आली होती त्यामध्ये किती वेतन अदा करणेबाबत स्पष्टता नसल्याने संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णय दि. १७ सप्टेंबर,२०१८ अन्वये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना अदा करावयाच्या किमान वेतनाच्या राज्य शासनाच्या संपूर्ण हिस्यांस पात्र होण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतीनी नियमाप्रमाणे दर चार वर्षानी

Scanned with CamScanner

नियमितपणे फेरआकारणी करणे व गत वर्षात सर्व करांच्या एकूण मागणीची ९०% वसूली करणे बंधनकारक राहील. संबंधित ग्रामपंचायतीच्या सर्व करांच्या वसूलीच्या प्रमाणात ग्रामपंचायत कर्मचारी यांना खालीलप्रमाणे किमान वेतन अनुज्ञेय राहील.

| अ.क्र. | ग्रामपंचायतींची सर्व करांच्या वसुलीची टक्केवारी | अनुज्ञेय किमान वेतन |
|---|---|---|
| १ | ९०% व त्यापेक्षा जास्त कर वसूली | १००% |
| २ | ७०% ते ८९% कर वसूली | ९०% |
| ३ | ५०% ते ६९% कर वसूली | ७०% |
| ४ | ५०% पेक्षा कमी वसूली | ५०% |

तथापि, नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा रोगराईमुळे शासन निर्णय दि. १७ सप्टेंबर,२०१८ मध्ये नमूद केलेल्या ग्रामपंचायतींच्या सर्व करांच्या वसूलीच्या टक्केवारीपेक्षा कमी कर वसूली झाल्यास ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किती टक्के वेतन अदा करण्यात यावे याबाबत स्पष्टता नसल्याने आर्थिक वर्ष २०२०-२०२१ या कालावधीतील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे अनुज्ञेय किमान वेतन कसे अदा करावे ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१९-२० या वित्तीय वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यातील बहुतांश जिल्हयात नैसर्गिक आपत्ती ( अतिवृष्टी व पूरपरिस्थिती ) मुळे राज्यातील शेतकरी वर्ग अडचणीत आला असून या वित्तीय वर्षातही शासनाच्या निर्देशानुसार वसूली झाल्याचे दिसून येत नाही. तसेच मार्च ,२०२० मध्ये कोविड -१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे शासनाने वेळोवेळी जाहीर केलेला लॉकडाऊन व यापुढे ही शासनाकडून लॉकडाऊन वाढविण्यात येण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे ग्रामपंचायत कर वसूलीवर सन २०१९-२० व सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात प्रतिकुल परिणाम होण्याची शक्यता आहे. शासन परिपत्रक दि. १७ सप्टेंबर,२०१८ मध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे कर वसूली होत नसल्यास ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना कसे वेतन अदा करावे याबाबत स्पष्टता नाही.

महाराष्ट्र राज्यातील बहुतांश जिल्हयात सन २०१९ मध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे व मार्च, २०२० मध्ये कोविड -१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे शेतकरी वर्ग अडचणीत आल्याने ग्रामपंचायतीच्या सर्व करांची वसूली शक्य होणार नाही. अशा परिस्थितीत शासन परिपत्रक दि. १७ सप्टेंबर,२०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व करांच्या वसुलीच्या टक्केवारीनुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय किमान वेतन देणे योग्य होणार नाही. ही बाब लक्षात घेता,



Scanned with CamScanner

आर्थिक वर्ष २०२०-२०२१ या कालावधीतील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे किमान वेतन करांच्या वसुलीच्या टक्केवारीशी न जोडता ग्रामपंचायतींच्या लोकसंख्या व उत्पन्नानुसार शासन निर्णय दि. ४ मार्च,२०१४ मध्ये नमूद केल्यानुसार किमान वेतनासाठी अनुज्ञेय शासन हिस्सा देय राहील व किमान वेतनाप्रमाणे उर्वरीत वेतन ग्रामपंचायतींनी स्वनिधीतून अदा करण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

तरी सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना दरमहा किमान वेतन अदा करणेबाबत दक्षता घेण्यात यावी. सदर आदेश **आर्थिक वर्ष २०२०-२०२१ या कालावधीतील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना** देण्यात येणारे **अनुज्ञेय किमान वेतन यापुरताच मर्यादित असेल.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(एकनाथ गागरे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई .
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा. मंत्री ग्रामविकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री ग्रामविकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व विभागीय आयुक्त.
७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
९. सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
१०. राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान/राष्ट्रीय ग्रामस्वराज्य
११. अभियान,शिवसागर अपार्टमेंट,मोदी बाग,कृषी महाविद्यालय,शिवाजी नगर,पुणे-४११०१६.
१२. आहरण व संवितरण अधिकारी,रोख शाखा,ग्रामविकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१३. निवडनस्ती (कार्यासन पंरा-३)



Scanned with CamScanner